**आरोग्य विभाग ,यवतमाळ.**

**(महाराष्ट्र शासन)**

**वैद्यकीय अधिकारी गट -अ ची पदे भरण्यासाठी जाहीरात.**

**जाहीरात क्र 01/2017** **जा.क्र/पदभ/यजिप/आरोग्य/स्था-3/1987/2017**

1.यवतमाळ जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरती करीता पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

2. संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.उमेदवाराने सदर अर्ज डाउनलोड करुन संपुर्णतः भरलेला अर्ज,मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक त्या कागदपत्राच्या साक्षंकित प्रतीसह जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.यवतमाळ येथे दि. 10/7/2017 पर्यत सांय.5.45 पर्यत सादर करावा.

**3.पदसंख्याः- 13**

**4.आरक्षणानुसार भरावयाचा पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **भरावयाची एकुण पदे** | **प्रवर्गनिहाय भरावयाची पदे** | | **समांतर आरक्षण** | | | **समांतर आरक्षणा व्यतीरीक्त इतर (सर्वसाधारण)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **प्रवर्ग** | **एकुण संख्या** | महीला | खेळाडु | अपंग | |
| 1 | वैद्यकिय अधिकारी गट- अ | 13 | अ.जा. | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | अ.ज. | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | वि.जा.अ. | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | | भ.ज.ब | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | | भ्.ज.क. | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | | भ्.ज.ड. | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | | विमाप्र | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| | | | इमाव | 3 | 1 | 0 | 0 | 2 |
| | | | खुला | 5 | 2 | 0 | 0 | 3 |
| **एकुण** | | | | **13** | **3** | **0** | **0** | **10** |

वर नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

**5**.विस्तृत जाहीरात **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.उपरोक्त नमुद पदासाठी अर्ज करु इच्छीणा-या उमेदवारांनी वेतनश्रेणी पात्रता,वयोमर्यादा,अर्ज शुल्क,सुचना,निवडीचे निकष इत्यादी तपशिलासाठी सदर संकेतस्थळाला भेट द्यावी.उमेदवारांनी अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन संपुर्णतः भरुन सादर केलेला अर्ज मुळ प्रतिज्ञा पत्र व आवश्यक त्या संक्षीप्त प्रती एकत्रीतपणे जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.यवतमाळ भावे मंगल कार्यालयासमोर,यवतमाळ येथे दि. 10/7/2017 पर्यत कार्यालयीन वेळेत पाठवावा.

**(टिपः- वरिल पदा संदर्भात विस्तृत स्वरुपाची जाहीरात** yavatmal.nic.in **व** zpyavatmal.gov.in **या संकेतस्थळावर उलब्ध करुन देण्यात आली आहे.**

**अटी व शर्तीः-**

1. यवतमाळ जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील भरती करीता पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.
2. संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावर सरळ सेवेने पदभरती करण्यासाठी **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात येत आला आहे.
3. उमेदवारांनी अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन संबधित जिल्हयाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ येथे स्वहस्ते /नोंदणीकृत डाकेने सादर करावा.
4. अपंगासाठीचे आरक्षणः-शासन अधिसुचना ,सार्वजनिक आरोग्य विभाग क्र/अपंग/2/55 आ-2 दिनांक 27 जुलै 2004 नुसार अपंग उमेदवारामधील फक्त क्षीणदृष्टी व अस्थिव्यंग (एका पायाने अपंग) उमेदवारच सदर पदासाठी पात्र असुन जो उमेदवार अशा प्रकारचे अपंगत्व स्पष्टपणे नमुद केलेले प्रमाणपत्र सादर करेल त्याच उमेदवाराचा सदर भरती प्रक्रीयेत विचार होईल.

   अपंगासाठीचे आरक्षण हे शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहायय विभाग क्र/अपंग-2007 /प्र.क्र.61/सुधार-3/दिनांक 20 एप्रिल 2006 नुसार अवलंबविण्यात आलेले आहे.
5. वेतनश्रेणीः- 15600-39100 अधिक ग्रेड वेतन रु.5400 व इतर अनुज्ञेय भत्ते शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.मवैअ-2011/प्रक्र-776/सेवा-3 दिनांक 14 डिसेंबर 2011 अन्वये पदव्युत्तर पदविका धारक उमेदवारांना 3 अतिरीक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना 6 अतिरीक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील.त्यामुळे विशेषज्ञ वैद्यकीय अधिका-याचे वेतन एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिका-यांपेक्षा जास्त असेल.

6.वय ः-

**6** (1) जाहीरात प्रसिध्दीच्या दिनांक रोजी वय 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत नियमाप्रमाणे शिथीलक्षम.

6.(2) शासकिय वैद्यकीय सेवेत स्थायी/अस्थायी/बंधपत्रीत स्वरुपात कार्यरत असणा-या उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त 5 वर्षापर्यत शिथील करण्यात येईल.

6 (3) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.म.वै.अ-२०११/प्रक्र745/11/सेवा-3 दि.३० ऑक्टोंबर 2013 या मधील नमुद विषयतज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविशेषज्ञ शैक्षणिक अर्हताधारक केलेले उमेदवारांच्या बाबत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त 10 वर्षापर्यत शिथील करण्यात येईल.

**7.शैक्षणिक अर्हता ः-**

7.(1) वैद्यकीय अधिकारी(एम.बी.बी.एस) पदासाठी संविधीक विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी कींवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम 1956 (1956 च्या 102) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसुचित विनीर्दीष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता.

7.(2) वैद्यकीय अधिकारी (विशेष तज्ञ) पदासाठीः- संविधीक विद्यापीठाची बालरोगचिकीत्सा किंवा शल्यचिकीत्सा किंवा औषधवैद्यक किंवा स्त्रीरोग किंवा बधिरीकरण किंवा मनोविकृत शास्त्र किंवा नेत्रशल्यचिकीत्सा किंवा क्षकिरण शास्त्र किंवा विकृतीशास्त्र किंवा अणु जिव शास्त्र किंवा शरीर किंवा रक्त संक्रमण या विशेषज्ञ शाखेतील भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ च्या १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दीतीय अनुसुचित विनिर्दीष्ट केलेल्या शाखेतील पदव्युत्तर पदविका किंवा पदवी.

7.(3) 10/7/2017 या दिनांकापुर्वी अथवा दिनांकास आंतरवासिता (**Internship**) पुर्ण असणारे उमेदवारच पात्र ठरतील.

7.(4) शुध्द आयुर्वेद/बी.ए.एम.एस.शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांनी या पदासाठी अर्ज करु नये

**8.निवड प्रक्रीयाः-**

**एकुण 100 गुण**

| तपशिल | एमबीबीएस अर्हता धारकासाठी गुणांचे प्रमाण(**weightage**) | पदव्युत्तर पदवी/पदविका शैक्षणिक अर्हताधारकासाठी गुणांचे प्रमाण(**weightage**) |
|---|---|---|
| पदवी परिक्षेच्या सर्व वर्षामध्ये मिळालेले सरासरी गुण | 60**%** (जास्तीत जास्त 60 गुण) | लागु नाही |
| पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी परिक्षेमध्ये मिळालेले सरासरी गुण | लागु नाही | 60**%** (जास्तीत जास्त 60 गुण) |
| शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर अस्थायी कींवा बंधपत्रीत स्वरुपात केलेली एकुण सेवा<br>किंवा | आदीवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला 4 गुण आणि बिगर आदीवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला 3 गुण या प्रमाणे जास्तीत 20 गुण<br>किंवा | आदीवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला 4 गुण आणि बिगर आदीवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला 3 गुण या प्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण<br>किंवा |
| शासन सेवेत नसल्यास पदवी परिक्षा उतीर्ण होवुन झालेले एकुण वर्ष | प्रत्येक वर्षाला 2 गुण या प्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण | प्रत्येक वर्षाला 2 गुण या प्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण |
| एकुण गुण | 100 | 100 |

**टिपः-**

1.शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग क्र/मवैअ-1010/390/प्र.क्र.366/सेवा-3 दिनांक 19 जुन 2010 अन्वये आदीवासी भागातील आरोग्य संस्था घोषीत करण्यात आल्या असुन सदर आरोग्य संस्थामधील वैद्यकीय अधिकारी पदावरील कामाचा अनुभव मुल्यांकनासाठी विचारात घेण्यात येईल.

2.उमेदवाराने सक्षम प्राधिका-याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.प्रमाणपत्र देण्यासाठी संबधित संस्था/कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

3.उमेदवाराची सेवा ही प्रत्येक सहामाही मध्ये मोजण्यात येईल.सहा महीण्यापेक्षा कमी सेवेसाठी गुण (**weightage**) देण्यात येणार नाहीत.

4.अनुभवासाठीच्या गुणांच्या मुल्यांकनासाठी 10/7/2017 हा अंतीम दिनांक राहील.

5.निवड प्रक्रीयेसाठी विहीत करण्यात आलेल्या निकषानुसार गुणांचे मुल्यांकन करण्यासाठी सर्व गुणपत्रके /प्रमाणपत्रे यांच्या साक्षांकित प्रती उमेदवारांने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.अन्यथा उमेदवाराचा अर्ज रद्दबादल करण्यात येईल.

6.प्राप्त अर्जाची छाननी करुन दिनांक 26/10/2016 च्या शासन परिपत्रकानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत व दिनांक 24/6/2016 च्या शासन परिपत्रकात नमुद विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

7.केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्तीच्या ठिकाणाचा पसंतीक्रम दर्शविण्याकरीता समुपदेशनाकरीता बोलविण्यात येईल.

8.समितीने सादर केलेली गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीचा पंसतीक्रम याची तपासणी करुन उमेदवारास नियुक्ती आदेश आरोग्य विभाग जि.प.यवतमाळ **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

9.नियुक्ती आदेशानंतर संबधित वैद्यकीय अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी रुजु झाल्यानंतर त्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात येईल.

10.नवनियुक्त वैद्यकीय अधिका-यांसाठी मुख्यालयी राहणे अत्यावश्यक राहील.त्यांचे वेतन हे बायोमॅट्रीक हजेरीशी संलग्न असेल.

**9.सर्वसाधारण**

9 (1) निवड झालेल्या उमेदवारांना दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी असेल.

9 (2) महाराष्ट्र वैद्यकीय आणि आरोग्य सेवा गट अ (वेतनश्रेणी रु.15600-39100+ ग्रेड वेतन रु.6600) या पदावर पदोन्नतीकरीता उमेदवारास संधी असुन त्याकरीता त्या पदाकरीता आवश्यक असलेल्या अर्हता पुर्ण करणे आवश्यक राहील.

9 (3) निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय राहील.

9 (4) निवड झालेल्या उमेदवाराने “ते किमान 5 वर्षाची शासकिय सेवा करतील किंवा न केल्यास शासनाने वेळोवेळी विहीत केलेली रक्कम दंड म्हणुन भरण्यास तयार आहेत” असे बंधपत्र देणे अनिवार्य असेल.

9(5) निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र मेडीकल कौन्सील अॅक्ट 1965 (महाराष्ट्र **XLVI,1965**) किंवा इंडीयन मेडीकल कौन्सील अॅक्ट 1956 (1956 च्या 102 ) नुसार त्याचे/तीचे नाव नोंदविणे अनिवार्य आहे.

**10.महत्वाचेः-**

10(1) उमेदवारांनी 100 रुपयांचा मुद्रांकपत्रावर नोटरी समोर आवेदनपत्रात नमुद केलेल्या माहीतीच्या अचुकतेबाबत आणि सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

10 (2) प्रतिज्ञा पत्राचा नमुना **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

10 (3) आवेदनपत्रासोबत सदर प्रतिज्ञापत्र जोडुन पाठिवणे आवश्यक आहे.अन्यथा आवेदनपत्र अपुर्ण समजुन फेटाळले जाईल.

10 (4) प्रमाणपत्रांच्या पडताळणी साठी प्रक्रीयेवेळी उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**11.अर्ज**

11 (1) सदर अर्ज **yavatmal.nic.in** व **zpyavatmal.gov.in** या संकेतस्थळावर दि.२३/७/२०१७ पासुन उपलब्ध होतील.

11 (2) उमेदवाराने खाली नमुद केलेल्या शुल्काचा राष्ट्रीयकृत बॅकेचा डीमांड ड्राप्ट **"**जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.यवतमाळ**"** यांचे नावाने काढुन अर्जासोबत जोडावा आणी संपुर्ण भरलेला अर्ज नमुद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्राच्या सांक्षाकिंत छायांकित प्रती व प्रतिज्ञापत्र त्यासोबत जोडावे.

11 (3) मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक कागदपत्रासह संपुर्ण भरलेला अर्ज आरोग्य विभाग जि.प.यवतमाळ या कार्यालयात दिनांक 10/7/2017 पर्यत कार्यालयीन वेळेत (सायं 5.45 पर्यत) पाठवावा.

11 (4) उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत.

11 (5) ऑन लाईन अर्जाच्या उपलब्धतेसंबधी कोणतीही अडचण आल्यास उमेदवाराने **दुरध्वनी क्र.07232- 242298** या वर संपर्क साधावा.

**12 शुल्कः-**

अ.खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारासाठीः- रु**. 300/-**

ब.मागास प्रवर्गाच्या उमेदवारासाठीः- रु. **150/-**

क.फक्त राष्ट्रीयकृत बॅकेच्या डीमांड ड्राप्ट व्दारे शुल्क अदा करावे.

| | | |
|---|---|---|
| सदस्य /सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हा निवड समिती तथा |
| जिल्हा परिषद,यवतमाळ | जिल्हा परिषद,यवतमाळ | जिल्हाधिकारी यवतमाळ. |